# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.07.2025** **वार-बुधवार**

---

**<u>टिळक</u>**

'केसरी' चे विश्वस्त-संपादक, डॉ. दीपक टिळक यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येनं उपस्थित होते. डॉक्टर टिळक यांचं अल्पशा आजारानं आज पहाटे निधन झालं. ते ७२ वर्षांचे होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती आणि लोकमान्य टिळक यांनी स्थापन केलेल्या अनेक संस्थांचे ते आधारवड होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी लोकमान्यांनी स्थापन केलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला डॉ. दीपक टिळक यांच्या कार्यकाळात मोठी उंची प्राप्त झाली. लोकमान्यांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचा वारसाही त्यांनी पुढे नेला. शैक्षणिक क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रातील डॉक्टर दीपक टिळक यांनी केलेलं कार्य मोलाचे ठरलं.

**<u>सीसीटीवी</u>**

राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा कार्यक्रम शासनानं हाती घेतला आहे. त्याचवेळी देखभालीची यंत्रणा उभी करण्यात यावी, अशी सूचना आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत केली. त्याचप्रमाणं कृत्रिम बुद्धिमत्तेचा अंतर्भाव करुन त्यानुसार यंत्रणा खरेदीच्या सूचना दिल्या जातील का? असंही आमदार शिरोळे यांनी शिक्षणमंत्र्यांना विचारलं. भविष्यकालीन आधुनिकतेचा विचार करूनच यंत्रसामग्री बसविली जाईल, असं आश्वासन शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिलं.

**घरकुल**

पुणे जिल्ह्यात विविध योजनांतर्गत घरकुल निर्मितीचं काम अनेक ठिकाणी प्रगतीपथावर आहे. खेड तालुक्यातील कडधे इथं प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियान  म्हणजे पीएम जनमन आवास योजनेअंतर्गत सुरू असलेलं गृहसंकुल उभारणीचं काम अंतिम टप्प्यात आहे.  पुणे जिल्हा परिषदेचे प्रशासक तसंच मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी आज या गृहसंकुल प्रकल्पाची पाहणी केली. या ठिकाणी लाभार्थ्यांना सर्व नागरी सुविधा मिळाव्यात यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना त्यांनी दिल्या.

**आधार**

आधार संच वितरणात पुणे जिल्हा विभागात प्रथम असल्याचं पुण्याचे उपजिल्हाधिकारी पल्लवी घाटगे यांनी सांगितलं. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक महसूल मंडळ, नगर पालिका आणि पुणे महानगर पालिका आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या विचारात घेता तसंच शहरी भागात होणारं स्थलांतरण विचारात घेता आधार संचांची आवश्यकता होती.

**मालमत्ता**

पुणे महापालिकेतून वगळून उरुळी देवाची आणि फुरसुंगी या दोन्ही गावांची स्वतंत्र नगरपरिषद करण्यात आल्यानं पुणे महापालिका आणि नगरपालिका यांच्यामध्ये मालमत्ता हस्तांतरण प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी हस्तांतरण समिती नेमण्यात आली आहे. पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि अन्य बाबींची जबाबदारी सध्या महापालिकेकडेच असून नगरपरिषद पर्यायी व्यवस्था करेपर्यंत महापालिकाच हे काम करणार आहे.

**प्रारुप**

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेअंतर्गत १३ पंचायत समित्यांमधील निवडणूक विभाग आणि निर्वाचक गणांची प्रारुप प्रभागरचना संबंधित कार्यालयांच्या सूचना फलकावर तसंच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या www.pune.nic.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे. या प्रारुप प्रभाग रचनेच्या अनुषंगानं २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे हरकती आणि सूचना सादर करता येतील. अशी माहिती उपजिल्हाधिकारी चारुशिला देशमुख-मोहिते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

**<u>दिव्यांग</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन यांच्याद्वारे शहरातील दिव्यांग नागरिकांची अचूक नोंद घेण्यासाठी व्यापक सर्वेक्षण मोहीम राबवण्यात येत आहे. दिव्यांग व्यक्तींची नेमकी संख्या, त्यांच्या अडचणी, गरजा आणि लाभार्थी योजना यांचा आढावा घेऊन अधिक प्रभावी नियोजन आणि सेवा देणं यासाठी हे सर्वेक्षण उपयुक्त ठरणार आहे. २०१६ च्या कायद्यानुसार २१ प्रकारचे दिव्यांगत्व निदर्शनास आलेले आहेत.  महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हे सर्वेक्षण वेळेत पूर्ण करून अचूक माहिती संकलनाचे निर्देश दिले आहेत.

**<u>डीबीटी</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी सुधारित थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. त्याअंतर्गत महापालिकेच्या १४६ शाळांमधील ४० हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शालेय साहित्य संचाचं वितरण करण्यात आलं आहे. उर्वरीत विद्यार्थ्यांनाही ३१ जुलैपर्यंत हे संच देण्याच्या दृष्टिनं नियोजन करण्यात आलं आहे.

**सीएनजी**

पीएमपीच्या ताफ्यात भाडेतत्त्वावरील नव्या सीएनजी बस दाखल व्हायला सुरुवात झाली आहे. भाडेतत्वावरील 400 पैकी 325 नव्या सीएनजी बस आत्तापर्यंत ताफ्यात दाखल झाल्या असून, उर्वरीत 75 बस याच महिनाअखेरपर्यंत ताफ्यात दाखल होणार आहेत. सध्या पीएमपीच्या ताफ्यात 1880 बस आहेत असं पीएमपीएमएल अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ-मुंडे यांनी सांगितलं.

**संप**

बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून रुग्णालयातील २३५ प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना तीन महिन्यांपासून विद्यावेतन न मिळाल्यानं त्यांनी संप पुकारून निदर्शनं केली. त्यावर प्रशासनाने तत्काळ चर्चा करीत आठवडाभरात वेतन देण्याचं आश्वासन दिल्यानंतर सर्व डॉक्टरांनी संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. इथे २३५ प्रशिक्षणार्थी डॉक्टर आहेत त्यांना दरमहा १८ हजार रुपये विद्यावेतन दिलं जातं.

पुणे आणि परिसरात उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत. कमाल तापमान २९ अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**